# रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्सच्या वतीने आरक्यूबीई क्विक सादर

**पुणे (प्रतिनिधी) :** रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्स (आरक्यूबीई) या कंपनीच्या वतीने वाहनांच्या विम्याचे दावे वेगाने निकाली काढण्यासाठी आरक्यूबीई क्विक हे लाईव्ह स्ट्रीमिंग सोल्युशन सादर करण्यात आले आहे. या सादरीकरण्यामुळे भारतीय बाजारपेठेत वाहन विम्याच्या दाव्यांसाठी आयओएसवर लाईव्ह स्ट्रीमिंग ॲपची सुविधा देणारी रहेजा क्यूबीई ही  मोजक्या काही कंपन्यांमधील एक ठरली आहे. आरक्यूबीई क्विक या ॲपमुळे विमा धारकांना आपल्या वाहनाच्या विम्याचा दावा वेगाने निकाली काढण्यास मदत होईल. या ॲपमुळे  विम्याच्या दाव्यांचा पाठपुरावा करता येईल ज्यामुळे ही प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह ठरेल. ग्राहकांच्या सोईनुसार मोबाईल ॲप किंवा लिंकद्वारे सर्व्हे अपॉईंटमेंट्स देखील बूक करण्याची लवचिकता मिळते.